# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १०६ / २०२३

रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणीस विलंब झाल्याने नुकसान भरपाई मिळण्याबाबत

श्री. कुमार दादू देसाई .................................................................................................. अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, (महावितरण) सांगली शहर विभाग.........................................प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १) श्री. भारतकुमार देसाई

२) श्री. संजय पाटील, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- श्री. आप्पासो मल्हारी खांडेकर, कार्यकारी अभियंता, सांगली

कोरम :- वंन्दना कृष्णा (निवृत्त भा.प्र.से.)

ई-सुनावणी तारीख :- १५ डिसेंबर २०२३

आदेश पारित दिनांक :- २५ जानेवारी २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ (मंच) यांच्या दिनांक २२ जून २०२३ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ३ ऑक्टोबर २०२३ रोजी दाखल केले आहे. मंचाने तक्रारदार यांचा अर्ज (क्रमांक ७३/२०२२) दिनांक २२ जून २०२३ च्या आदेशान्वये नामंजूर केली.

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनात व दिनांक १५ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या सुनावणीतील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

- अपिलार्थीने नवीन ५ कि.वॅट क्षमतेच्या रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणी करीता (ग्राहक क्र.२७९२४००५९५३८) विहित नमुन्यातील अर्ज प्रतिवादी महावितरणकडे दिनांक २१ एप्रिल २०२१ रोजी रू.५९०/- इतक्या रक्कमेची नोंदणी फी भरून दिनांक ४ मे २०२३ रोजी आवश्यक ती कागदपत्रे महावितरण कार्यालयात जमा केली.

- अपिलार्थीच्या सदर अर्जास उपविभागीय कार्यलय, माधवनगर सांगली, यांनी दिनांक २९ जून २०२१ रोजी मंजूरी दिली. अपिलार्थीने त्यांच्या प्रतिनिधीमार्फत कामपूर्तता अहवाल (Work Completion Report) दिनांक २७ जुलै २०२१ रोजी प्रतिवादी कार्यालयास सादर केला. काम पुर्तता अहवालातील त्रुटीची पुर्तता अपिलार्थीनी दिनांक २० सप्टेंबर २०२१ रोजी केल्यानंतर प्रतिवादीने दिनांक ३० ऑक्टोबर २०२१ रोजी अपिलार्थीस वीज जोडणी दिली.

- अपिलार्थीने वीज जोडणी करीता झालेल्या विलंबामुळे नुकसान भरपाई मिळण्याबाबत दिनांक २९ ऑगष्ट २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने अपिलार्थीची तक्रार दिनांक २२ जून २०२३ च्या आदेशान्वये नामंजूर केली. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक ३ ऑक्टोबर २०२३ रोजी माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयात अभिवेदन दाखल केले. अपिलार्थीने त्यांच्या अभिवेदनामध्ये 'रूफटॉप सौरउर्जा वीज जोडणी करीता झालेल्या विलंबामुळे नुकसान भरपाई' मिळावी अशी मागणी केली आहे.

३. प्रतिवादी महावितरणने दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ च्या उत्तरातील व दिनांक १५ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या सुनावणीतील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

- अपिलार्थीने नवीन ५ कि.वॅट क्षमतेच्या रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणी करीता (ग्राहक क्र२७९२४००५९५३८) विहित नमुन्यातील अर्ज नोंदणी फी रू.५९०/- चा भरणा करून प्रतिवादी महावितरणकडे दिनांक २१ एप्रिल २०२१ रोजी सादर केला. दिनांक ४ मे २०२३ रोजी आवश्यक ती कागदपत्रेही महावितरण कार्यालयात जमा केली. सदर अर्ज दिनांक १७ मे २०२१ रोजी सर्वेक्षणासाठी विभाग कार्यालयाकडे पाठविण्यात आला. त्यानंतर दिनांक १८ जून २०२१ रोजी विभाग कार्यालयाने 'स्थळ तपासणी अहवाल' व 'अंदाजपत्रक' माधवनगर उपविभाग

सांगली कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर केले. सदर अर्जास माधवनगर उपविभाग कार्यालयाने दिनांक २९ जून २०२१ रोजी मंजूरी दिली.

- अपिलार्थीने त्यांच्या ठेकेदारामार्फत दिनांक २७ जुलै २०२१ रोजी काम पुर्तता अहवाल (Work Completion Report) महावितरणकडे सादर केला. परंतू सदर अहवालामध्ये डब्लूसीआर शीट, संरचनेची अर्थिंग, इन्वर्टर, एलए इत्यादी बाबतच्या त्रुटी आढळल्याचे अपिलार्थीस कळविले. दिनांक २० सप्टेंबर २०२१ रोजी अपिलार्थीने त्यांची पुर्तता केली. अपिलार्थी ऐवजी सौर ठेकेदाराने दिनांक २० सप्टेंबर २०२१ रोजी अनुपालन अहवाल सादर केला. सदर अर्जाची महावितरणने योग्य ती पडताळणी करून दिनांक ३० ऑक्टोबर २०२१ रोजी अपिलार्थीस रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणी दिली.

- अपिलार्थीने रूफटॉप सौरऊर्जा नेट मीटरींग आणि प्रक्रीयेतील त्रुटी दूर करण्यासाठी भरपाई आणि उपायात्मक कारवाईची मागणीसाठी दिनांक २९ ऑगष्ट २०२२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. दिनांक ३० डिसेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रिड इंटरॲक्टीव्ह रूफ टॉप रिन्युएबल एनर्जी जनरेटींग सिस्टीम) विनियम २०१९ हे संपुर्ण महाराष्ट्र राज्याला लागू झाले. मंचाने सौरऊर्जा वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाकरीता नुकसान भरपाई देण्याबाबतची कोणतीही तरतूद नाही. सबब, मंचाने नुकसान भरपाईची तक्रार नामंजूर केली.

- प्रतिवादीने नमुद केले कि, वीज जोडणी देण्यास कोणताही उशीर झालेला नाही. महावितरणने रूफटॉप सोलर प्रणालीसाठी दिनांक १२ मे २०२२ रोजी अंर्तगत कृती मानके परिपत्रक जारी केले आहे, त्यात ग्राहकांसाठी व महावितरणसाठी सदर कामासाठी वेळेच्या मर्यादा घालून दिलेल्या आहे. परंतू, रूफटॉप सोलर प्रणाली मध्ये ग्राहक व महावितरण यामध्ये समन्वय राहावा या उद्देशाने परिपत्रक पारित केले. त्या परिपत्रकाचा व नुकसानभरपाईचा काहीही संबध नाही. विनाअनुदानीत योजनांर्तगत नेट मीटरींग कनेक्टीव्हीटी महावितरणच्या १.३ पर्यवेक्षण शुल्क डीडीएफ योजनेसारखीच आहे. पण महावितरण १.३ पर्यवेक्षण शुल्क वसूल करत नाही; त्यामुळे सौर ठेकेदाराकडून रूफटॉप सौरऊर्जा कनेक्शन बसविताना प्रतिवादीचे कोणतेही नियंत्रण नसते. रूफटॉप सौरऊर्जा कनेक्शन स्थापनेच्या योजनेत महावितरणची कोणतीही भुमिका नाही. विलंबाची जबाबदारी ही केवळ ग्राहकाची व सौरऊर्जा ठेकेदाराची आहे.

म.वि.नि.आ.

- काम पूर्ण झाल्याच्या अहवालाची पडताळणी / काम पुर्तता अहवाल (डब्लूसीआर) केल्यानंतरच महावितरणच्या अधिकाऱ्यांना अपेक्षीत काम व झालेले काम यातील तफावत कळते.

- नेट मिटरींग कनेक्शन करारा संबधात ग्रिड इंटरॲक्टीव्ह विनियम २०१९ मधील कलम १० मध्ये "विवाद निराकरण" बाबत खालील प्रमाणे नमुद केले आहे.

*"१०.१ या कराराअंर्तगत उद्भवणारे कोणतेही विवाद दोन्ही पक्षाद्वारे सदभावनेने आणि न्याय पध्दतीने त्वरीत सोडवले जातील.*

*१०.२ परवानाधारकाने ज्याचे निवारण केले नाही अशा बिलिंगबाबतच्या कोणत्याही तक्रारीच्या संदर्भात पात्र ग्राहकाने संबधित नियमानुसार स्थापन केलेल्या संबधित ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे संपर्क साधावा."*

नेट मीटरींगचा करार हा 'अपिलार्थी' व 'महावितरण' यांच्यामध्ये झाला आहे. अपिलार्थीने रूफटॉप सौरऊर्जा कनेक्शनच्या विलंबाबाबत कोणतीही तक्रार असेल, तर, त्यांनी प्रतिवादी महावितरणशी संपर्क करणे सयुक्तिंक ठरले असते. अपिलार्थीने विलंबाबाबत महावितरण माधवनगर सांगली कार्यालयाशी कधीही संर्पक केला नाही, वा तक्रारीची नोंद केली नाही. आणि वीज जोडणी विलंबाने मिळण्याची तक्रार अकरा महिन्याच्या कालावधीनंतर मंचाकडे दाखल केली.

- प्रतिवादीने नमुद केले की, सदर प्रकरणाचा कालावधी हा कोवीड-१९ महामारीच्या दरम्यानचा होता. त्या कालावधीत, अखंडीत वीज पुरवठा राखणे हे महावितरणचे प्रथम प्राधान्य होते. प्रतिवादीने जलदगतीने रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणी दिली, तरी अपिलार्थीने वीज देयकाबाबत तक्रार दाखल न करता रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणीस झालेल्या विलंबाकरीता नुकसान भरपाईच्या मागणीची तक्रार दाखल केली.

- रूफटॉप सौरऊर्जा कनेक्शनबाबतची सर्व कागदपत्रे सौर ऊर्जा ठेकेदाराकडुन हाताळली जातात. अपिलार्थीने कोणत्याही समस्येबाबत प्रतिवादींशी संपर्क साधलेला नाही. काही सौरऊर्जा ठेकेदार ग्राहकाची दिशाभूल करून, याबाबत महावितरणची प्रतिमा मलीन करतात.

➢ प्रतिवादीने नमुद केले की, ते मंचाच्या आदेशाचे पालन करीत आहेत. रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणीस झालेल्या विलंबाबाबत अपिलार्थी माननीय आयोगाकडे पाठपुरावा करू शकतात. रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणीस महावितरणकडून कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नसताना, रूफटॉप सौरउर्जा वीज जोडणीच्या विलंबाबाबत सौर ऊर्जा ठेकेदारांनी अपिलार्थींची दिशाभूल केलेली आहे. प्रतिवादीने कोवीड-१९ महामारीच्या काळातही शक्य तितक्या लवकरात लवकर वीज जोडणी दिली आहे व अपिलार्थींची प्रतिवादीविरुध्द या विलंबाबाबत कोणतीही तक्रार नव्हती. सबब, सदर अभिवेदन नामंजूर करण्यात येऊन निकाली काढण्यात यावे अशी विनंती केली आहे.

## विश्लेषण व निर्णय

४. अपिलार्थीने नवीन रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणी करीताचा अर्ज प्रतिवादी महावितरणकडे दिनांक २१ एप्रिल २०२१ रोजी केला. त्यानंतर सदर अर्जास महावितरणने दिनांक २९ जून २०२१ रोजी मंजूरी दिली. त्यानंतर अपिलार्थीने कामपूर्तता अहवाल (Work Completion Report) दिनांक २७ जुलै २०२१ रोजी प्रतिवादी कार्यालयास सादर केला. काम पुर्तता अहवालातील त्रुटीची पुर्तता अपिलार्थींनी दिनांक २० सप्टेंबर २०२१ रोजी केल्यानंतर प्रतिवादीने दिनांक ३० ऑक्टोबर २०२१ रोजी अपिलार्थीची रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणी कार्यान्वीत केली.

५. माननीय आयोगाने दिनांक ३० डिसेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रिड इंटरॲक्टीव्ह रूफ टॉप रिन्युएबल एनर्जी जनरेटींग सिस्टीम) विनियम २०१९ अधिसूचीत केले. रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणीसाठी विलंब झाल्यास, ग्राहकाला नुकसान भरपाई देण्याबाबत कोणतीही तरतूद त्यामध्ये नाही. रूफटॉप सौरऊर्जा इन्स्टॉलेशन ही ग्राहकाची जबाबदारी असून, त्या बाबतचा काम पुर्तता अहवाल सादर करणे ही गरजेचे आहे. त्यात विसंगती असल्यास अनुपालनासाठी ग्राहकाच्या निदर्शनास आणने, त्याची पुर्तता करून घेणे, तपासणी करणे इत्यादी कामे झाल्यानंतर रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणी चालू करून घेणे हे महत्वाचे आहे. काम पुर्तता अहवालातील त्रुटीची पुर्तता अपिलार्थींनी दिनांक २० सप्टेंबर २०२१ रोजी केल्यानंतर प्रतिवादीने दिनांक ३० ऑक्टोबर २०२१ रोजी अपिलार्थीची 'रूफटॉप सौरऊर्जा वीज जोडणी' कार्यान्वीत केली. या सर्व बाबींचा व कोव्हीड २०१९ महामारीचा विचार करता प्रतिवादीकडून जाणूनबुजून उशीर झाला, असे वाटत नाही.

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

६.	ग्राहकास मंचाकडे फक्त वीज देयकाबाबतच्या त्रुटी करीता तक्रार दाखल करता येईल. इतर प्रकारच्या तक्रारीबाबत अपिलार्थीने व वितरण कंपनीने सामंज्यसाने निर्णय घेणे गरजेचे आहे. सदर तक्रार ही वीज देयकाबाबतची नसल्याने त्याबाबतचे निराकरण वितरण कंपनीने केलेले आहे.

७ .	अपिलार्थीचे प्रतिनिधी हे स्वतः सौरउर्जा ठेकेदार आहेत. या ठिकाणी अपिलार्थी ठेकेदार व प्रतिवादी यांनी समनव्याने हे प्रकरण हाताळणे अपेक्षीत होते. मात्र शुल्लक कारणासाठी 'ग्राहक तक्रार निराकरण यंत्रणेचा' वापर व वेळ घेतल्या बद्दल हे न्यायालय नाराजी व्यक्त करीत आहे.

८.	मंचाने योग्य तो निर्णय दिला आहे. मंचाच्या निर्णयात फेरफार वा हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येऊन निकाली काढण्यात येत आहे.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित
श्री. बी. एस. झुंबरे
सचिव
म.वि.नि.आ.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)